जाहिर नोटीस

तमाम लोकांना (इलेक्ट्रीशिअन) कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथील खोली क्रमांक ५२ येथे संगणक व स्कॅनर कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक असलेल्या विदयुत फिटींगसह एकुण ५२ इलेक्ट्रीक पॉइंट (electric switch and socket) बसविणे आवश्यक असून, सदर कामासाठी याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत.

दरपत्रके सादर करताना ती बंद लखोटयातून सादर करणेत यावीत. तसेच लखोटयावर "इलेक्ट्रीक फिटींगसाठी दरपत्रक" असा उल्लेख करणेत यावा. तसेच सदर कामासाठी वापरणेत येणारी वायर तसेच इलेक्ट्रीक स्वीच व सॉकेट ही चांगल्या दर्जाची असावीत.

यशस्वी दरपत्रकदारास जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे येऊन वर नमुद काम करावयाचे आहे. यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

दरपत्रक सादर करणेसाठी दरपत्रकदाराकडे वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, आयकर **PAN** क्रमांक असणे आवश्यक आहे.

तरी इच्छुकांनी (इलेक्ट्रीशिअन) जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथील खोली क्रमांक ५२ येथे संगणक व स्कॅनर कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक असलेल्या विदयुत फिटींगसह एकुण ५२ इलेक्ट्रीक पॉइंट (electric switch and socket) बसविणेचे कामासाठी आपली दरपत्रके दिनांक १४/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत अथवा तत्पूर्वी या कार्यालयाकडे सादर करावीत.

दिनांक – ११/०५/२०२६.

सहा. अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय,
सिंधुदुर्ग.

म.जा.क्र.वित्त/३४०५ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग.
दिनांक – ११/०५/२०२६.

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.(ई–मेलद्वारे)
२. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस.(ई–मेलद्वारे)
३. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग– ओरोस.(ई–मेलद्वारे)
४. मा. सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस.(ई–मेलद्वारे).
५. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग. (ई–मेलद्वारे).

(सदरची जाहिर नोटीस आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत यावी.)